

ध्ये उद्यापासून लिटररी फेस्ट

# लेखकांना भेटायचंय?

प्रियांका गवळी, एचआर कॉलेज
muntainbox@gmail.com

वाचन हा तुमचा वीक पॉइंट आहे? तुमच्या आवडत्या प्रसिद्ध लेखकांना भेटायचं आहे का? मग विवेकानंद इन्स्टिट्यूटमध्ये १२ आणि १३ जानेवारी या दोन दिवसांत रंगणाऱ्या 'लिटररी फेस्टिव्हल'ला तुम्ही हजेरी लावायला हवी. वाचक आणि लेखक यांचं नातं अधिक घट्ट करावं या उद्देशानं हा फेस्ट भरवण्यात आला आहे. साहित्यप्रेमींसाठी पर्वणी ठरणाऱ्या या फेस्टिव्हलचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर आहे.

विद्यार्थ्यांनी आयोजित केलेला असा हा एकमेव फेस्टिव्हल असल्याचं सांगितलं जातं. फेस्टच्या पहिल्या दिवशी ५ वेगवेगळी व्याख्यानं आयोजित करण्यात आली आहेत. तर दुसऱ्या दिवशी सहा वेगवेगळ्या विषयांची चर्चासत्रं पार पडणार आहेत. 'पोअरिंग द हार्ट' या लेखनविषयक चर्चासत्रात, तरुण वाचकांमध्ये लोकप्रिय असलेले सुदीप नगरकर, धीरज गुप्ता, जगदीप कपूर हे प्रसिद्ध लेखक येणार आहेत. केवळ लेखनविषयकच नव्हे तर 'कॉर्पोरेट वर्ल्ड', 'वंडर वूमन', 'मराठी भाषा आणि त्यापलीकडे, एक वाट अस्मितेकडे' अशी निरनिराळी चर्चासत्रं लिट फेस्टिव्हलमध्ये रंगणार आहेत. फोटोग्राफी आणि मोबाइल फिल्म फेस्टिव्हलचं देखील आयोजन करण्यात आलं आहे. मराठी सिनेतारका पल्लवी जोशी, मधुरा वेलणकर या फेस्टला खास हजेरी लावणार आहेत.

## उद्योजकांची माहिती

'रिडिस्कव्हरिंग वनसेल्फ :चूझिंग द राईट पाथ' अशी थीम असलेल्या एका कार्यक्रमात जगमोहन भंवर, स्फूर्ती सहारे, सतीश मोध, मृणालिनी पाटील यांसारख्या मोठ्या लेखकांशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. 'रूट्स टू विंग्स' ही दुसरी व्याख्यानमाला देखील १२ तारखेला होईल. भारतातल्या यशस्वी उद्योजकांची माहिती यात मिळेल. अक्षय राठी, घनश्याम ढोलकीया यासारखे मान्यवर यात सहभागी होतील. 'द राईज ऑफ निव्ह इंडिया', 'म्युझिक टुडे' या विषयांवरही पहिल्या दिवशी व्याख्यानं होतील.

## मराठी साहित्यावरही प्रकाश

लिट फेस्टिव्हलच्या दुसऱ्या दिवशी 'मराठी भाषा आणि त्यापलीकडे; एक वाट अस्मितेकडे' हे मराठी साहित्याशी संबंधित चर्चासत्र पार पडणार आहे. पल्लवी जोशी, मधुरा वेलणकर, गणेश मतकरी हे मान्यवर यात सहभागी होणार असून, ते विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.